॥ श्री ॥

उत्तेजनार्थ द्वितीय : श्रीम - नमिता वाळवळकर (२६)

# " हा दैवाचा खेळ निराळा "

मंडईच्या रस्त्याने माझ्याच नादात मी भरभर चालले होते. बाजारातून भाजी आणून, सगळा स्वैपाक करायचा होता. मनात विचारांचे कल्लोळ चालु होते. कामाचा पसारा डोळ्यासमोर दिसत होता. त्यामुळे पावलं आपसुकच भराभर पडत होती आणि अचानक मागून माझ्या नावाची हाक ऐकु आली, चमकून मागे वळून हाकेच्या दिशेने पाहिले व नजरेने शोध घेत, आठवणींना ताण देत, नक्की आपल्यालाच हाक मारली ना याचा विचार करते ना करते तोच अगदी आपल्या नेहमीच्या शैलीत गडगडाटी हसून, हाक देऊन, हाकेचे अंतर क्षणात कापून धावत येऊन, मला गच्च मिठी मारत ओळखीची सलामी दिली आणि माझ्या तोंडातून नकळत म्हटले की, अगं किशी किती वर्षांनी भेटतेस गं? भर रस्त्यातच तीने मला आलिंगन दिल्याने, आजुबाजूच्या लोकांच्या नजरा, काही रागाच्या, काही कुतुहलाच्या तर काही चक्क वेगळ्याच दिसल्या. तिला पटकन बाजुला ओढत नेले व एक धपाटा जोरदार मारून मी पण माझ्या मैत्रीची ओळख दिली.

आमच्या नाशिकच्या वाड्यात राहणारी, ५ बहीणी, एक भाऊ, आई, वडील व आजी अशा भरगच्च कुटुंबात असलेली किशी उर्फ किशोरी इनामदार, सगळ्यात धाकटी - शेंडेफळ असलेली, बडबडी पण तितकीच लाघवी व प्रेमळ अशी माझी जिवाभावाची सखी. ती भेटल्याचा आनंद इतका अवर्णनीय होता की तिच्याशी किती आणि काय गप्पा मारू असं झालं होतं मला, आणि मगाशी मनात साठलेला माझ्या घरातला कामाचा पसारा मैत्रीण भेटल्याच्या नादात पार विसरून गेले आणि मी भूतकाळात गढून गेले....

किशीची आणि माझी मैत्री म्हणजे आमच्या वाड्यातला एक चर्चेचा विषय होता त्याकाळी. प्रचंड बडबडी, फटकळ पण तितकीच प्रामाणिक व सोशिक अशी होती ती. काय करते बिचारी, घरात अठरा विश्व दारिद्र्य होतं, तिच्याहून मोठ्या चार बहीणी व तिच्यापेक्षा लहान भाऊ शाम्या उर्फ शरद. पूर्ण नाव जरी छान ठेवले असले तरी त्याचा शॉर्टकट करूनच हाक मारायची पद्धत होती. आमचा मुळी दिवसच उगवायचा सकाळी सकाळी नळावर पाणी भरण्यापासून! मग आमच्या वाड्यातल्या सर्व जणी हंडे बादल्या घेऊन नंबर लावायच्या व जिचा

Scanned with OKEN Scanner

नंबर लागे, त्याने ३।३ हंडे, नळाचे पाणी द्यायचे. यावर किशोरीची करडी नजर असायची. कुणी मध्ये घुसत की ही वसकन्लीच म्हणून समजा, त्याच्या अंगावर. त्यामुळे किशोरी असली की, कुणाची ताकद नसायची मध्ये घुसण्याची!

आमच्या वाड्यात १० बिऱ्हाडे होती. सर्व मध्यम वर्गीय पण खेळीमेळीने रहायचे, त्यांची भांडणे अधून मधून मुळवदन, पण मुलं एकत्र झाली की मोठेही भांडण विसरून लगेच एकोप्यानं बोलायचे. पण किशोरीच्या घरात मात्र सतत तिच्या आई-वडिलांचे भांडण सुरु असायचे. दोनच दोन खोल्या व त्यात ८ माणसं व सतत होणारी भांडणे त्यामुळे या सर्व मुली वैतागून वाड्यात कुणा कुणाच्या घरात पडून असायच्या. किशोरीचा मुक्काम मात्र कायम आमच्याच घरी असायचा. माझा मुंबईचा काका, नाशिकला आला की माझ्या आईला विचारायचा, वहिनी हिला काही घर बिर आहे की नाही, २४ तास आपल्याच घरी मुक्काम असतो.

अशी ही किशोरी, तिच्या बाबतीत मात्र दुर्दैवाचे फेरे लवकर धरून जणू नाचत होते. तिच्या वडिलांनी या चारही मुलींची लग्न, त्या ११ वी होताच पटापट लावून दिली, कोणाची पसंती आहे/नाही, विचारात न घेता. बिचाऱ्या चौघी जणी दिल्या घरी नांदायला गेल्या पण. किशोरी थोडीफार डॅशिंग असल्याने, तिने घरात थोडा विरोध दर्शविलाच! पण उलट वडिलांनी तिला व तिच्या बरोबर आईलाही चांगलंच झोडपून काढलं. शेवटी विचारी पदरी पडलं आणि पवित्र झालं, असं मानून सासरी नांदू लागली

आज लग्नही झाले नव्हते तर किशोरी दोन मुलांची आईपण झाली होती व अशा तऱ्हेने तिचा संसार सुरु झाला होता पण म्हणतात ना देवाला तिचे हे ही सुख बघवलं नाही आणि एक दिवशी अचानक तिची आई सकाळी सकाळीच आमच्याकडे रडत रडत येऊन सांगू लागली की किशोरीच्या मिस्टरांना गाडीने उडवले आहे व ते खूप सिरीयस आहेत. ही बातमी ऐकून सर्व सुन्नच झाले व थोड्या वेळात पुन्हा दुसरी बातमी आली की तिचा नवरा हे जग सोडून गेला. मग काय विचारात

तिच्या दुःखाला तर पारावारच उरला नाही. तिथपासूनच तिचे दुर्दैवाचे फेरे सुरु झाले. पदरात २ लहान मुले, मोठ्ठा जेमतेम ११ वी पर्यंतच, नोकरी नाही. बिचारी २ लहान मुलांना घेऊन निमूटपणे माहेरी रहायला आली. वडीलांनी जेमतेम २ महिने आपल्या घरी ठेऊन घेतले व पुन्हा तिची पाठवणी तिच्या सासरच्या घरी केली. एक मात्र होते, तिची ताई खूपच समजूतदार व विचारांची होती. तिने किशोरीला नोकरी शोधण्यास सांगितले. त्याकाळी कंपनीत नोकऱ्या सहज मिळत होत्या. सातपुरमध्ये एका कंपनीत तिला नोकरी मिळाली. कंपनी नामांकित असल्याने, तिथे पगारही बऱ्यापैकी मिळत होता. दोन मुलांना सासूच्या हवाली करुन किशोरी नोकरीला जाऊ लागली. जेमतेम ४/५ वर्ष होत नाही तर तिच्या सासूबाईनांही या जगाचा निरोप घेतला. मग मुलांना शेजार चांगला असल्याने त्यांच्याकडे ठेऊन तीने पुढील वाटचाल पुन्हा सुरु केली. कंपनीतील पगाराने तीचे व मुलांचे चांगले भागत होते. बघता बघता मुलगी १२ वी पास झाली अन मुलगा १० वी पास झाला.

तोपर्यंत माझेही लग्न होऊन, मी पुण्याला स्थाईक झाले होते. माझ्या लग्नात तीने मला खूपच मदत, अर्थात शारिरीक म्हणजे ~~खरेदी~~, खरेदी इ. साठी आगदी बरोबरी येऊन सर्वोतोपरी मदत केली. लग्नात ती थोडी बाजू बाजूलाच होती तरी पण तीच आतून मला एक आधार वाटत होता. मी ही नोकरीच्या व्यापात व संसाराच्या रहाटगाड्यात पूर्णपणे रमुन गेले.

किशोरीच्या बाबतीत दुर्दैव तिचे काही पाठ सोडत नव्हते. एके दिवशी भर पावसाळ्यात तीचा मुलगा, गोदावरी नदीत पुर आला असतांना सुद्धा मित्रांच्या नादाने पोहायला गेला आणि पाण्याच्या अंदाज न आल्याने पुरात वाहून गेला. ह्य मात्र तीने पुरती हाय खाल्ली. माझ्या भावाने फोनवर ही बातमी कळविल्यावर तर माझ्या पायाखाल जमीनच हादरली. काय रे देवा, तु पण असा कसा ? बिचारी कशी बशी संसाराचा गाडा एकटीच्या बळावर रेटत असतांना तिच्या ~~पद~~ पदरात एवढे मोठे दुःख टाकले. तरणाताठा मुलगाच हिरावून नेलास. मी ऐकल्यावर शुन्य नजरेने विमनस्क अवस्थेत बसुन होते.

मला पण काय बोलावं सुचेना. कशी बशी समजूत घालून मी पुण्याला परत आले.

नंतर मात्र तीने जॉब सोडून घरीच खाणावळीचे डबे करु लागली. कारण आता मुलगी पण वयात येत होती. तिला एकटीला सोडून ती काही करु शकत नव्हती. मुलीला मात्र ती फुलासारखी जपत होती. मुलीला तीने खूप शिकवलं, मुलगी आर्किटेक्ट झाली अन स्वतःच्या पायावर तीला उभी केली. पण इथेही नियती दुष्ट आड आली, मुलीने परजातीय लग्न सोडा पण परधर्मीय मुलाशी लग्न जमवलं. इथे मात्र तिने रुद्रावतार घेऊन प्रचंड विरोध केला पण मुलीच्यात तसूभरही फरक पडला नाही. ती तिच्या निर्णयावर ठाम राहीली. मग मात्र हिंमत तिच्या पवित्रा बदलून, मुलीला निक्षून सांगितलं की, तु कधी परत पण आजपासून तुझा माझा संबंध संपला, तुझ्यासाठी माझ्या घराचे दार कायम बंद राहतील. मुलीने पण तिनकाच तडकाने घर सोडलं. नंतर मी पण तिच्या मुलीला खूप समजावून सांगितलं पण काहीही उपयोग झाला नाही. किती खूप रडली, हट्टवली व आपल्या सासरी दाखून हे पण निरखून जाणते हे डाव्यांनी पहावं, पालकां तिचा जीव खूप तडफडला. पण मग मात्र ती एकटी लटकल्या माणसासारखी राहू लागली. मी तीला पुण्याला घेऊन आले. काही दिवस राहिली व शेवटी माझं प्राक्तन मलाच भोगलं पाहिजे म्हणून आल्या पावली ती नाशिकला निघून गेली. म्हणाली आता माझ्या या अशा रडगाण्यात आयुष्याकडून तुला कशाला त्रास देऊ? जिथे खुद्द परमेश्वरच माझ्या विरुद्ध आहे तिथे मी कुणाकडे दाद मागू? काय कुणाचं पाप केलं म्हणून माझ्या नशीबी एवढी मोठी शिक्षा केली. मी पण निःशब्द झाले.

नाशिकला पोचल्यावर मला फोनवर म्हणाली की मी आता फक्त माझ्यासाठी जगणार आहे. मी ही अशी कमकुवत मनाची नाहीय ग. पण परिस्थितीने मला असं केलं, पण आता मी पुन्हा पहिल्यासारखी अशी जगेन की परमेश्वरालासुद्धा कबूल करावं लागेल की किती खंबीर काळीज मनाची आहे म्हणून! माझ्या स्वर्गीय वडिलांच्या आठवणीसाठी जगेन तसेच मला दोन गोंडस मुलं देणाऱ्या माझ्या स्वर्गीय पतीराजांच्या आठवणींसोबत जगेन व उर्वरीत आयुष्य सत्कारणी लावेन.

नंतर नंतर माझसी नाशिकला जाणं झालं नाही. कधीतरी भावाला भेटलो की भरभरून बोलले पण त्या बोलण्यात थोडीफार दुःखाची झालर असते असंही आज म्हणाल. मी म्हटलं त्याला की अरे परिस्थितीने तो असंही झालं असावं. पण काहीही असो मी माझ्या व्यापात इतकी गुंतले की मधली काही वर्ष तिथं काही खबरबात समजली नाही. त्यात २, ३ वर्ष करोनाने खाल्ली व आज अचानक अशा ती मला रस्त्यात भेटली.

विचारांच्या नादात मी तिच्याकडे एकटक बघत होते तर मला जोरदार चिमटा काढून म्हणाली कशी, काय गं कुठे तंद्री लागली होती गं, चल समोरच्या हॉटेलमध्ये जाऊ, पोटभर खाऊ या व मनसोक्त गप्पा मारू मग.

मग मीच तिचे हे सर्व बेत हाणून पाडले व तिला हाताला धरून, माझ्या नव्या घरात घेऊन आले. मग टरपल्यासारखी इमारतीच्या प्रवेशद्वारापासून आजूबाजूला बघत न्याहाळत आमच्या मोठ्या इथल्या मजल्यावर माझ्या नव्या वास्तुत प्रवेश केला. घराच्या दरवाजा समोर असलेल्या गजानन महाराजांच्या फोटोला पाहून दारातच थबकली. भक्तीभावाने नमस्कार करून, डोळे मिटून उभी राहिली. गजानन महाराजांकडे काय मागणं मागितलं कुणास ठाऊक पण मावळी ती पूर्वीचीच किशोरी दिसली. मी मनात म्हटलं की ही कधी पासून भक्ती मार्गाला लागली. पण म्हणतात ना दैवाचे फेरे कोणाच्या आयुष्यात कधी पडतील हे सांगता येत नाही. परिस्थिती माणसाचे आयुष्य बदलवते तसं माझ्या किशोरीच्या बाबतीत झालं.

घरात येऊन पाय धुवून जी सोफ्यावर फतकल मारून माझ्याशी गप्पा मारायला लागली की तोपर्यंत माझा स्वयंपाक, देवपूजा आटोपली तरी तिची टकळी चालूच होती. मी म्हणाले अग तुझं तोंड कधी गं दुखत नाही, मातीचं असत तर फुटून गेलं असतं तर म्हणते कशी, आज खूप वर्षांनी मला अन तुझ्याशी मोकळं बोलायला मिळालं. दुसरं कोण असत गं माझ्याशी बोलायला ? इथेही त्यांच्या त्यांच्या व्यापात व भावाने तर आम्हा चौघी बहिणींशी संबंधच तोडले आहेत. आई वडील तर हयात नाहीत. म्हणून बोलले गं

तुझ्याही. खूप गप्पा झाल्यावर मी तिला विचारलं की आता तू
काय करतेस? तर म्हणाली की अगं नाशिकला एक संस्था आहे,
ती दत्तक मूल देऊन, आपल्याला त्यांचं पालकत्व देऊन, हमी वर्षात
आपल्याला ते थोडाफार खर्च देऊन आपली गुजराण होते. दरवर्षी
मी दोन मुलांचे संगोपन करायचे, त्या मुलांच्या खाण्याचा व शिक्षणाचा
खर्च ती संस्था करते. आपण फक्त त्यांच्या निवासाची म्हणजे
राहण्याची सोय करायची. आपलाही थोडाफार खर्च ती संस्था करते
आणि माझाही थोडाफार बँक बॅलन्स आहे. त्यात इतर सर्व खर्च
भागवते. अगं ही दत्तक मुलं हेच माझं विश्व, हाच माझा आनंद,
समाधान आणि सर्वस्व. रक्ताच्या नातेवाईकांनीही एवढे प्रेम,
जिव्हाळा, आपलेपणा दिला नसेल एवढे सुख मला त्यांचा सांभाळ
करतांना मिळाला. परमेश्वराने तेवढे सुख तरी माझ्याकडून हिरावून
घेऊ नये हीच इच्छा. मी ही मनातल्या मनात तथास्तु म्हटले!
एवढे बोलून नेहमीप्रमाणे गडगडाटी हसून, बाकी माझ्या सर्व
प्रश्नांना बगल दिली व हसत मुखाने माझा निरोप घेतला
आणि तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघतांना माझ्या मनात
आले की, या दुर्दैवी जीवाने किती यातना सोसल्या, जीवनात
चढउतार, दुःख, विरह, रितेपणा आणि एकाकीपणा सुद्धा ...

वरील कथा सत्यघटनेवर आधारीत आहे.